असा. क्र. १०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, एप्रिल ४, २००७/चैत्र १४, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. **१४५-१४८**

दिनांक ३ एप्रिल २००७ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.**

**(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ४ एप्रिल २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९६४ चा महा. २०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :---



[**किंमत** : रुपये ९.००]

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :--- १९६४ चा महा. २०.

" (फ-१अ) " जिल्हा उप निबंधक " याचा अर्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये, नियुक्त करण्यात आलेला, सहकारी संस्थांचा जिल्हा उप निबंधक, असा आहे ; ". १९६१ चा महा. २४.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (अ) मध्ये, " जिल्हाधिकाऱ्याने " या मजकुरानंतर, " किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधकाने " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये, पोट-कलम (४) मधील,----

(एक) खंड (अ) मधील, " जिल्हाधिकारी " या मजकुरानंतर, " किंवा यथास्थिति, ज्याने निवडणुकांचे कामकाज चालवले तो जिल्हा उप निबंधक " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील, " जिल्हाधिकारी " या मजकुरानंतर, " किंवा यथास्थिति, ज्याने निवडणुकांचे कामकाज चालवले तो जिल्हा उप निबंधक " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) खंड (क) मधील " जिल्हाधिकारी " या मजकुरानंतर " किंवा यथास्थिति, ज्याने निवडणुकांचे कामकाज चालवले तो जिल्हा उप निबंधक " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४ अ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ अ मध्ये,---

(एक) पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :----

" (१) (अ) ज्यांचे कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये फीच्या रूपाने मिळालेले वार्षिक उत्पन्न लगतपूर्वीच्या बाजार वर्षामध्ये पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा

बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदारांची यादी तयार करणे आणि अशा बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांचे कामकाज चालवणे याबाबतचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण, जिल्हा उप निबंधकाकडे निहित असेल ; आणि

(ब) ज्यांचे कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये फीच्या रूपाने मिळालेले वार्षिक उत्पन्न लगतपूर्वीच्या बाजार वर्षामध्ये पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल, अशा बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदारांची यादी तयार करणे आणि अशा बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांचे कामकाज चालवणे याबाबतचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण, जिल्हाधिकाऱ्याकडे निहित असेल.

मतदार यादी तयार करण्याच्या आणि निवडणुकांचे कामकाज चालवण्याच्या प्रयोजनांसाठी, प्रत्येक बाजार समिती, कोणत्याही वर्षामध्ये या अधिनियमान्वये फीच्या रुपाने मिळालेल्या सर्व रकमांच्या पाच टक्के किंवा दरसाल दहा हजार रुपये, यांपैकी जी कमी असेल तेवढ्या रकमेचा निवडणूक निधी स्थापन करील. " ;

(दोन) पोट-कलम (३) मध्ये, " जिल्हाधिकारी " आणि " जिल्हाधिकाऱ्यास " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या ठिकाणी " जिल्हाधिकारी किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधक " आणि " जिल्हाधिकाऱ्यास किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधकास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) पोट-कलम (४) मध्ये, " जिल्हाधिकारी " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिकारी किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधक " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) पोट-कलम (५) मध्ये, " जिल्हाधिकारी " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिकारी किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधक " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मध्ये, पोट-कलम (१) मधील स्पष्टीकरणामध्ये " जिल्हाधिकाऱ्याने किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याने " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १५ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये,---

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २२ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, " जिल्हाधिकारी " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " असा अधिकारी " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :---

" जिल्हाधिकारी किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधक किंवा जिल्हाधिकाऱ्याने किंवा जिल्हा उप निबंधकाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला उप जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा सहकारी संस्थांच्या सहायक निबंधकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी " ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " जिल्हाधिकारी " आणि " जिल्हाधिकाऱ्याला " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या ठिकाणी " जिल्हाधिकारी, जिल्हा उप निबंधक " आणि " जिल्हाधिकाऱ्याला, जिल्हा उप निबंधकाला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :----

" (४) सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबाबत विवाद उपस्थित झाल्यास, जिल्हाधिकारी किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधक अध्यक्षस्थानी असल्यास तो स्वतः त्या विवादांचा निर्णय करील ; आणि इतर कोणत्याही बाबतीत, अध्यक्षस्थानी असणारा अधिकारी तो विवाद निर्णयासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा यथास्थिति, जिल्हा उप निबंधकाकडे निर्देशित करील. जिल्हाधिकाऱ्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल, मात्र त्यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ६ अन्वये नेमलेल्या आयुक्ताकडे अपील करता येईल आणि सहकारी संस्थांच्या विभागीय सह निबंधकाकडे अपील करता येण्याच्या शर्तीस अधीन राहून, जिल्हा उप निबंधकाचा निर्णय अंतिम असेल ; आणि अशा कोणत्याही निर्णयाच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.".

१९६६ चा महा. ४१.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.